**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल विधानमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-**

१. महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० मधील कलम २३ अन्वये मंडळ वार्षिक अहवालाचे विवरण तयार करील अशी तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन मंडळाचे सन २१-२०२० या वित्त वर्षाचा वार्षिक अहवाल तयार करण्यात आला आहे. कर्मचा-यांच्या अभावामुळे सदर अहवाल संकलनास थोडा उशिर झाला. तथापि दि. ०१/०२/२०२२ रोजी तयार झालेला संकलित अहवाल छपाईकरिता शासकीय मुद्रणालयास पाठविण्यात आला. सदरचा अहवाल अंतिम छपाई करुन पुस्तक स्वरुपात शासकीय मुद्रणालयाकडुन दि.१९/०६/२०२३ रोजी मंडळास प्राप्त झालेला आहे. सदर वार्षिक अहवालास दि.१५/०९/२०२२ रोजी झालेल्या मंडळ सभेची मंजुरी घेण्यात आली आहे. सदरचा वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यात येत आहे.

२. त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल अंतिमत: तयार होईपर्यंत अनुक्रमानुसार घटनांची माहिती : -**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ चा वार्षिक अहवाल तयार झाल्याची तारीख | २९/१२/२०२१ |
| २ | शासकीय मुद्रणालयास वार्षिक अहवाल छपाईसाठी दिल्याची तारीख | ०१/०२/२०२२ |
| ३ | मंडळ सभेची मान्यता | १५/०९/२०२२ |
| ४ | वार्षिक अहवाल छपाई झाल्याच्या प्रती मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्याची तारीख | १९/०६/२०२३ |
| ५ | वार्षिक अहवाल विधानमंडळास सादर करण्यासाठी शासनाकडे पाठविल्याची तारीख | ०३/०७/२०२३ |

(डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार)
उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन.